पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा. महिला व बाल कल्याण समिती
**कार्यपत्रिका क्रमांक - ४**
सभावृत्तांत

दिनांक :- २३ / ०५ / २०१२ वेळ :- दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महिला व बाल कल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक - २३/०५/२०१२ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. भारती फरांदे - सभापती
२) मा. मोटे किरण बाळासाहेब
३) मा. जवळकर वैशाली राहुल
४) मा. सौ. साळुंके सविता सुरेश
५) मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
६) मा. आल्हाट मंदा उत्तम
७) मा. सौ. ठाकरे मंदाकिनी अर्जुन
८) मा. काळे विमल रमेश
९) मा. बाबर शारदा प्रकाश

याशिवाय मा.गायकवाड - सहा.आयुक्त, मा. भंडारे - प्र. उपनगरसचिव, मा.जगताप - समाज विकास अधिकारी, मा.जगदाळे - सहा. प्रकल्प अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा. सदस्यांच्या संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला -

विषय क्रमांक १ :- मनपा हद्दीतील व मनपा शाळेतील १० वीला ८०% गुण मिळवून उत्तीर्ण होणा-या विद्यार्थीनींना मनपा मार्फत मोफत संगणक देणेबाबत - मा.सविता साळुंके मा.किरण मोटे यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक ०९/०५/२०१२ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ३) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा. सभापती यांनी प्रकट केले.

ठराव क्रमांक - ५ विषय क्रमांक - १
दिनांक - २३/०५/२०१२
सूचक - मा.सविता साळुंके अनुमोदक - मा. किरण मोटे
संदर्भ - मा. सविता साळुंके मा. किरण मोटे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विकास योजना विभागामार्फत महिलांसाठी / मुलींसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील व मनपा शाळेतील १० वी ला ८०% गुण मिळवून उत्तीर्ण होणा-या विदयार्थीनींना महापालिकेमार्फत मोफत संगणक देणेस मान्यता देणेत येत आहे. या योजनेसाठी खालीलप्रमाणे अटी शर्ती राहतील.

१) अर्जदार विद्यार्थीनीचे पिंपरी चिंचवड शहरात वास्तव्य असले पाहिजे. त्यासाठी रेशनकार्ड, घरपट्टी पावती, आधारकार्ड इ. पुरावा द्यावा लागेल.
२) अर्जदार विद्यार्थीनी पिंपरी चिंचवड मनपा शाळेतील असावी.
३) १० वी परिक्षेत ८०% गुण मिळवून उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.
४) लाभार्थीस अशा प्रकारची मदत फक्त एकदाच मिळेल.
५) लाभार्थीस संगणक देण्याचा अथवा नाकारण्याचा तसेच अटी / शर्तीमध्ये बदल करण्याचा अधिकार मा. आयुक्त अथवा अतिरिक्त आयुक्त यांना राहिल.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( भारती फरांदे )**
सभापती
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस/४/कावि/ ८५५ /२०१२
दिनांक :- २८/०५/२०१२

प्र. उपनगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

\\Nagersachiv४\nnn\Nagersachiv१\mahila-११-१२\agenda-२doc.